लोकमत

epaper.lokmat.com
पुणे, रविवार, दि. ४ फेब्रुवारी २०२४ ८

# हुतात्मा राजगुरूंच्या कर्तृत्वाचा वारसा पुढे चालवा

## देवेंद्र बुट्टे-पाटील: वार्षिक पारितोषिक वितरण व गुणगौरव समारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरूनगर : देशाच्या स्वातंत्र्यासाठी आत्मबलिदान देणाऱ्या हुतात्मा राजगुरूंच्या विचारांचा, कर्तृत्वाचा वारसा विद्यार्थ्यांनी पुढे चालवावा, प्रामाणिकपणे अभ्यास करावा आणि स्वतःला करिअररूपाने सिद्ध करावे, असे आवाहन खेड तालुका शिक्षणप्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांनी केले.

ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे-पाटील महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण व गुणगौरव समारंभाप्रसंगी बोलत होते. याप्रसंगी संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक शांताराम घुमटकर, बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर उपस्थित होते.



गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करताना ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील व मान्यवर.

ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी दोन्ही महाविद्यालयांतील विविध उपक्रमांचे व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. ते म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था प्रयत्नशील असून, विद्यार्थ्यांच्या प्रबोधनासाठी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येते. विद्यार्थ्यांनी गुरुजनांचा आदर करावा. आपले सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी स्वतः प्रयत्न करावेत. आपल्या कलागुणांनी स्वतःला समृद्ध करावे. विद्यार्थ्यांनी बेशिस्तपणा न करता अभ्यासाकडे पूर्ण लक्ष द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

महाविद्यालयातील क्रीडा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, सांस्कृतिक विभाग, तसेच विविध शाखांतील गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्रक देऊन गौरविण्यात आले. क्रीडा विभागातील मीनाक्षी साळुंखे, सृष्टी बोऱ्हाडे, आदिल सिकीलगार, तनिष्का काळे, आविष्कार स्पर्धेतील सुमित इंगोले, एन.सी.सी.तील निरंजन कोरडे तेजस देसले, वक्तृत्व स्पर्धेतील तेजस्विनी गौड, अक्षदा कोळेकर यांच्यासह पीएच.डी.प्राप्त प्राध्यापकांचा विशेष सन्मान करण्यात आला. अहवालवाचन प्राचार्य. डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक, पारितोषिक वाचन प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. सारिका गोरे, प्रा. योगेश मोहिते, प्रा. दिलीपकुमार गुप्ता यांनी, तर आभार उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर यांनी मानले.

Scanned with OKEN Scanner